International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.455
Volume 3, Issue 2, April-June 2023 ID: IJCRTA000073 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य

## सूर्यवंशी नामदेव दिगंबर

**लेखक सलंग्रता:**
पीएच.डी संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**लेख संदर्भ:** सूर्यवंशी ना. दि. (2023). यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य**.** International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 3(2), 26-29. ijcrta.org

**सारांश:**
यशवंतराव बळवंतराव चव्हाण (मार्च १२, इ.स. १९१३:कराड, महाराष्ट्र - नोव्हेंबर २५, इ.स. १९८४) हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणून काम केले होते. तर काही काळ ते भारताचे संरक्षणमंत्री सुद्धा होते. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म हेन्द्रे पाटील मराठा समाजात झाला जन्म १२ मार्च, १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. त्यांनी १ मे १९५८ रोजी धुम्या गडावर जाऊन तिथे पांडुरंगाची मूर्ती स्थापन केली व राष्ट्रसंत भगवानबाबांच्याच्या समोर धूम्या गडास भगवानगड नाव दिले. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. "युगांतर", "सह्याद्रीचे वारे", "कृष्णाकाठ", "ऋणानुबंध" ही त्यांची साहित्यसंपदा आहे.

**संकेत शब्द:** यशवंतराव चव्हाण, राजकीय, सामाजिक आर्थिक योगदान, इत्यादी.

**प्रस्तावना :**
आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख होतो. यशवंतराव हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तर होतेच पण ते साहित्यिक, रशिक विचारवंतही होते. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व हे सर्वगुणसंपन्न अशा स्वरूपाचे होते. यशवंतराव चव्हाण हे 1956 ला द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बनले नंतर ते संयुक्त महाराष्ट्राचे 1960 ला पहिले मुख्यमंत्री झाले. 1962 ला केंद्रात संरक्षण मंत्री म्हणून कार्य केले. त्याच्या या कार्याचा अभ्यास या लेखात करण्यात येणार आहे यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे भाग्यविधाते मानले जातात. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण अशा स्वरूपाचे महान कार्य केले यशवंतराव चव्हाण हे लोकनेते, समतोल राजकारणी, कुशल प्रशासक, व्यवहार चतुर, तत्त्वचिंतक कुटुंबवात्सल्य अशा स्वरूपाचे एक महान व्यक्तिमत्व होते.

**विषय निवडीचा हेतू**:
प्रस्तुत विषयामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य आणि वैचारिक चढणघडण याचा अभ्यास करणे हा या संशोधन कार्याचा हेतू आहे.

**संशोधनाची गृहितके:**
**1)** यशवंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीत त्यांचा सुसंस्कृतपणा व मानवतावादी विचार यांचा मोठा सहभाग आढळतो याचा अभ्यास करणे.
**2)** यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.
**3)** आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान कसे महत्त्वपूर्ण होते याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**
प्रस्तुत संशोधनाकरिता समाजशास्त्रीय, विश्लेषणात्मक आणि चरित्रात्मक विश्लेषण या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. या संशोधन कार्यासाठी प्राथमिक व द्वितीय माहितीचा वापर करण्यात येणार आहे, तसेच मासिके, वृत्तपत्रे व इंटरनेटचा आधारही घेण्यात येणार आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील योगदान**:
1) **यशवंतराव चव्हाण आणि राष्ट्रीय एकात्मता:**

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या राज्यापेक्षा अगोदर राष्ट्राला महत्त्व दिले आहे. त्यांनी भारतात ब्रिटिश राजवटीनंतर राष्ट्रीय एकात्मता असणे ही एक मूलभूत गरजू मानली होती. भारतात विविधतेत एकता आहे, त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता महत्त्वाची आहे असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. भारतीय संस्कृती ही विविध अंगाने नटलेली आहे, त्यातून एकात्मता हेच भारताचे सौभाग्य निर्माण करेल असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. 'लोकशाही हा आपल्या देशाच्या प्रशासन प्रणालीचा प्राण आहे. लोकशाहीत लोक किंवा जनता ही सार्वभौम असते. लोकशाहीत प्रत्येक कृती ही लोककेंद्रीत आणि लोककल्याणाची असावी यासाठी विचारविनिमय आणि सहमती असणे हे खूप महत्त्वाचे असते.'[1] लोकशाही शासन पद्धतीने प्रत्येक नागरिकास विकासाची समान संधी लाभेल आणि समानतेची, अनुभवांची, सहजीवनाची, सहानुभावाची भावना त्यांच्या मनात निर्माण करून ते रुजवावी लागेल आणि वाढीस आणावी लागेल अशी स्पष्ट भूमिका यशवंतराव चव्हाण यांनी मांडली आहे. 'यंदाच्या शिवजयंतीला महत्त्व तर अधिक आहे कारण आजपासून आपण महाराष्ट्र राज्य स्थापनेचा उत्साह साजरा करीत आहोत. अशा परिस्थितीत पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या भागाचे प्रथम एक संबंध राज्य निर्माण होते आहे. हे सर्व कसे घडत गेले याचा इतिहास आपल्यापुढे अगदी ताजा आहे.'[2] यावरून आपल्याला यशवंतरावांचे राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य समजून घेता येते.

2) **यशवंतराव चव्हाण आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ:**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून पुढे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. याचे सर्वश्रेय मोठ्या प्रमाणात यशवंतराव चव्हाण यांना दिले जाते. भाषावार प्रांतरचनेचे तत्व काँग्रेसने इसवी सन '1920 मध्ये मान्य केले असले तरी राज्य पुनर्रचनेचा प्रश्न भारत स्वातंत्र झाल्यानंतर हाती घ्यावा असा विचार पुढे आला. इसवी सन 1947 सालीच्या ऑगस्टमध्ये अकोला येथे बोलणे केले आणि त्याच्याशी जो करार झाला त्याला 'अकोला करार' म्हणून ओळखले जाऊ लागले. या करारात विदर्भ, मराठवाडा, मुंबई व उर्वरित महाराष्ट्र असे चार उपप्रांत करण्याची तरतूद होती. संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी करण्यासाठी देव यांचा पुढाकार होता.'[3] 'संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कर्तृत्वाचा कळस अध्याय होता. संयुक्त महाराष्ट्राची जोरदार चळवळ महाराष्ट्रात सुरू होती, त्याच दरम्यान राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल जाहीर झाला. या अहवालात समतोल द्विभाषिक राज्याची कल्पना मांडण्यात आली. या संकल्पनेला यशवंतराव चव्हाण यांनी कठोरपणे विरोध केला.'[4] परंतु काही बंधनामुळे हा विरोध त्यांनी बाजूस ठेवला. संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यासाठी यशवंतरावांनी आपल्या पद्धतीने प्रयत्न सुरू ठेवले होते.

त्यावेळी पंडित नेहरू यांनी संयुक्त महाराष्ट्रापेक्षा महाराष्ट्र निष्ठा व भारतनिष्ठा ही भूमिका यशवंतरावांची ओळखली होती कारण संघर्ष हा सर्वतोपरी चालू होता. संयुक्त महाराष्ट्रात चळवळ ही गुंतागुंतीची चळवळ होती कोणता प्रांत कुठे व कसा समावेशित करावयाचा हा विषय खूप कठीण होता. 'यशवंत नीतीला यश मिळण्यासारखे दिसू लागले. इसवी सन 9 डिसेंबर 1959 ला कार्यकारणीने स्वतंत्र राज्याच्या निर्मिती बद्दल शिक्कामोर्तब केला. विधानसभेत यावर चर्चा केली त्यावेळी केलेले यशवंतरावांचे भाषण हृदयस्पर्शी होते. विलग होण्याचे दुःख होते तर स्वतंत्र राज्य निर्मितीचे स्वप्न साकार होण्याचा आनंद होता.'[5] '1 मे 1960 रोजी द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्य अस्तित्वात आली. अशा प्रकारे मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याचे तमाम मराठी जनतेचे स्वप्न अखेरीस साकार झाले. द्विभाषिक मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हेच संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ठरले.'[6] महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सोहळा पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर पार पडला. यावेळी यशवंतराव म्हणाले - "आम्ही आज त्यांना परत आश्वासन देतो की महाराष्ट्राचे हे जे राज्य निर्माण झाले ते मराठी जनतेच्या कल्याणाचे काम तर करीलच शिवाय मराठी भाषिका जवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, जे उदांत आहे त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू कारण आमचा पहिल्यापासून विश्वास आहे, की भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल.'[7]

3) **आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार:**

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कर्तुत्वाच्या आणि नेतृत्वाच्या जोरावर संयुक्त महाराष्ट्र मिळवून संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान मिळवला. संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्यासमोर अनेक समस्या आणि आव्हाने होती.त्यामध्ये सामाजिक एकतेचा प्रश्न, आर्थिक विकासाचा प्रश्न, शासन यंत्रणा, प्रादेशिक असमतोल, सीमा प्रश्न, भावनात्मक ऐक्य असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर होते.'संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर यशवंतरावांनी आपले लक्ष पूर्णपणे राज्याच्या विकासावर केंद्रित केले. विशेषतः शेती, उद्योग, बेरोजगारी, अर्थव्यवस्था या महत्त्वाच्या विषयाकडे त्यांनी जाणून बुजून लक्ष दिले. यासाठी पहिल्या दिवसापासून उद्योग खात्याची जबाबदारी स्वतःकडे ठेवली. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ म्हणजे एमआयडीसी ची स्थापना करून उद्योग आणि कारखानदारीला शासकीय अभय दिले.'[8]

ई. स.1 मे 1960 ते 19 नोव्हेंबर 1960 पर्यंत ते मुख्यमंत्री पदावर होते. 'कोकण विकासाचा प्रश्न हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. तसाच तो काहीसा दुखावलेला प्रश्न आहे. याची मला जाण आहे. कोकणाचे पहिले महत्त्वपूर्ण संबंध म्हणजे, कोकणची माणसे मी मानतो. कोकणामध्ये बुद्धिमान, कर्तबगार असे मनुष्यबळ आहे त्यांना आपली बुद्धिमत्ता व कर्तृत्व दाखविण्यासाठी कोकणची सरहद्द ओलांडावी लागेल ही गोष्ट खरी आहे. विकासासाठी कुठल्याही योजनेमध्ये शेवटी फार महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे त्याला मिळणारे शिक्षण यावर त्याचा विकास अवलंबून असतो.'[9]

4) **एक जान ते संरक्षण मंत्री:**

राज्य जी चालतात, ती राज्य चालविणाऱ्या माणसापेक्षा राज्य शक्तीच्या बाहेरची माणसे असतात, त्यांच्या पुण्याईने चालतात. ती माणसे त्या परंपरा आणि शक्ती निर्माण करतात त्यांच्या साह्याने चालतात. जनतेच्या काही अपेक्षा असतात, काळाच्या काही प्रेरणा असतात इतिहासाच्या काही हाका असतात आणि त्याला उत्तर म्हणून शेवटी राजकीय पक्ष बनत असतो.'[10] चिनने भारतावर इसवी सन 1962 साली आक्रमण केले, त्यावेळी संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांचा पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राजीनामा घेतला. यशवंतराव चव्हाण हे संरक्षण मंत्रीपदी विराजमान झाले. लष्कराच्या तीनही दलात नव्या संरक्षण मंत्र्याच्या कारभाराबद्दल व वर्तन पद्धती बद्दल वातावरण निर्माण होत होते संसदेत त्यांना भक्कम पाठिंबा होता पंडित नेहरूंनाही कळून आले की, यशवंतरावाचा कारभार सुधारत आहे त्यांचे निती धैर्य वाढले आहे.'[11]

'यशवंतराव चव्हाण यांनी जे आर डी टाटा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिने सर्व तपासणी करून नाशिक येथे विमानाच्या सर्व भागांची उपकरणांचे उत्पादन करण्यासाठी शिफारस केली.'[12] पंडित नेहरूंच्या विनंतीला मान देऊन यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली होती. 20 नोव्हेंबर 1962 ला ते दिल्लीला पोहोचले देशातील सामान्य माणूस असून यशवंतराव चव्हाण यांनी सैनिकांचे मनोबल उंचावण्याचे कार्य, अस्थिर परिस्थिती स्थिर करण्याचे कार्य त्यांनी केले. इतर अनेक महत्त्वाचे कार्य त्यांनी संरक्षण मंत्री असताना पार पाडले. सैन्य दलाचे भारतीय करण केले, भारत-पाक युद्धामधी ल कामगिरी इत्यादी कार्य त्यांनी पार पाडले. यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री असताना आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर संरक्षण खात्यात राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनात अमुलाग्र बदल केला आणि परराष्ट्र धोरणात ही आमुलाग्र बदल झाला.

5) **सर्व गुणसंपन्न कुशल प्रशासक:**

शासन आणि प्रशासन सुयोग्य पद्धतीने चालविण्यासाठी नेतृत्वा जवळ माणुसकी, सहृदयता सुसंस्कृतपणा या त्रिवेणी गुणांचा संगम असावा लागतो. तो संगम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रशासकीय कार्यातून दिसून येतो. यशवंतराव चव्हाण यांच्या शासकीय निर्णयावरून आणि मंत्री पदावर असताना माणुसकीने वागण्याच्या व्यवहारातून लक्षात येते. आपत्तीप्रसंगी अडचणीत सापडलेल्यांना त्वरित मदत मिळावी म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीची स्थापना यशवंतराव चव्हाण यांनी केली. मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, विरोधी पक्ष नेता इत्यादी पदावर त्यांना कामाबद्दल आस्था व चिंता होती. त्यांच्या कुशल प्रशासनाच्या नेतृत्वामुळे त्यांचे अखीव धोरण सर्वांच्या मनात बिंबत होते. त्यात एक उदाहरण म्हणजे विकासाभिमुख एक कुशल प्रशासक असल्याने विकासाभिमुख प्रशासनाची महाराष्ट्रात गरज असून त्यासाठी आर्थिक व्यवस्थापन जाणणारे मनुष्यबळ आवश्यक आहे हे यशवंतरावांनी जाणले होते. म्हणून स. गा. बर्वे सारख्या अर्थतज्ज्ञांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान देऊन प्रगतिशील महाराष्ट्राचा आर्थिक पाया घातला.'[13]

6) **निष्कर्ष:**

भविष्यातील महाराष्ट्र कसा असावा याबाबत यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत स्पष्ट भूमिका तयार केली. राज्याच्या कृषी, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक विकासाला त्यांनी योग्य दिशा दिली. समाजकारण आणि राजकारण यात त्यांनी आपल्या भारतभूमीबद्दलचा, आपुलकीचा, प्रेमाचा ठसा उमटला. तसेच त्यांचे साहित्य, क्रीडा, संस्कृती, अशा अनेक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. चीन भारत युद्धाच्या कार्याचा गौरव करताना म्हटले, "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला" अशा शब्दात जाणकारांनी त्यांचा गौरव केला. हा त्यांच्या कार्याचा गौरव हा महाराष्ट्राच्या भूमीला मिळालेला मानबिंदू आहे. यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य हे आधुनिक महाराष्ट्रात प्रत्येकाचे कल्याण हेच हित समोर ठेवून त्यांनी महाराष्ट्र निर्माण केला.

यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य महान स्वरूपाचे होते असा निष्कर्ष निघतो. यशवंतरावांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत खूप महान स्वरूपाचे योगदान दिलेले आहे हे आपल्याला दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

**1)** मासिक लोकराज्य, मार्च 2012, अंक 12, पृ.5.
**2)** यशवंतराव चव्हाण (2006), सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथम आवृत्ती, पृष्ठ 37.
**3)** गोविंद तळवलकर (2012), यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व मौज, प्रकाशन, मुंबई, पृ.**72.**
**4)** मासिक लोकराज्य, (मार्च 2012), अंक 12 पृ.6-7
**5)** ऑनलाइन दैनिक लोकसत्ता, 13 मे 2018.
**6)** ऑनलाइन दैनिक लोकसत्ता, 29 डिसेंबर 2014.
**7)** गोविंद तळवलकर (2012), यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व मोज प्रकाशन मुंबई पृ. 114.
**8)** मासिक लोकराज्य (मार्च 2012), अंक 12 पृ.7.
**9)** यशवंतराव चव्हाण (2006), सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, प्रथम आवृत्ती पृ 70.
**10)** विनायक पाटील (2005), यशोधन, यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार, राजहंस प्रकाशन पहिली आवृत्ती, पुणे, पृष्ठ 20, 21.

**11)** गोविंद तळवलकर **(**2012) यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व**,** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान**,** प्रथम आवृत्ती मुंबई पृ.174**.**
**12)** कित्ता पृ. 174.
**13)** लोकराज्य**, (**मार्च 2012**)** अंक 12 पृ. 29**.**

IJCRTA